ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434, Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख १० एप्रिल, १९५७ | अंक १५

## विविध माहिती

**विम्याच्या पूर्ण रकमा देणार**—आयुर्विमा कॉर्पोरेशन स्थापन झाल्यानंतर २९ विमा कंपन्यांची आर्थिक परिस्थिति दिवाळखोरीची असल्याचें आढळून आलें होतें. ह्या सर्व कंपन्यांच्या मुदत भरलेल्या विमेदारांना त्यांच्या विम्याच्या संपूर्ण रकमा देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्यासाठी कॉर्पोरेशनला ७० ते ८० लाख रुपये पदरचे द्यावे लागतील.

**बोटी खरेदी करण्याच्या वाटाघाटी**—अमेरिकेजवळ पडून असलेल्या कांहीं मालवाहू बोटी खरेदी करण्याच्या वाटाघाटी भारत सरकार करीत आहे. युद्धकाळांत बांधलेल्या ‘ लिबर्टी ’ ह्या नांवाच्या बोटी घेण्याचा सरकारचा विचार आहे.

**आदिवासी विभागाचा विकास**—सुरत जिल्ह्यांतील धरमपूर ह्या भागांत आदिवासींची बरीच वस्ती आहे. ह्या भागांतील लोकांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी एक योजना आखण्यांत आली असून तिचा उद्घाटन समारंभ नुकताच झाला. योजनेसाठी २७ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. तिचा फायदा सुमारें २५,००० लोकांना मिळेल.

**अमेरिकन बोटींना इषारा**—अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्यानें अमेरिकन बोटींना इषारा दिला आहे कीं, त्यांनीं सुएझच्या कालव्याचा इतक्यातच वापर करूं नये. खात्याच्या मतानें कालव्यांतील अडथळे अद्याप पूर्णपणें दूर झालेले नाहींत. शिवाय अजून कांहीं कायदेशीर प्रश्नांचाहि उलगडा झालेला नाहीं.

**रेडिओ टेलिफोनचा दुवा**—भारत आणि अरबस्थान ह्यांच्या दरम्यान रेडिओ टेलिफोनचें दळणवळण सुरू करण्यांत आलें आहे. भारताच्या सरकारचें आतां २० देशांशीं ह्या पद्धतीनें दळणवळण सुरू आहे. पहिल्या तीन मिनिटाला ४० रुपये व नंतर प्रत्येक मिनिटाला १३ रु. ५ आणे द्यावे लागतील.

**कोसी धरणापासून कालवा**—कोसी कंट्रोलबोर्डानें चालू वर्षी २८ मैल लांबीचा प्रमुख कालवा खोदण्याच्या कामास सुरवात करण्याचें ठरविलें आहे. संपूर्ण कालवा खोदण्यासाठी ७२·५४ लाख रुपये लागतील. त्यापैकी कांहीं भाग ह्या वर्षी पूर्ण होईल. ह्या भागासाठी १६ लाख रुपये खर्च येईल.

**केरळ राज्यांतील पगार**—केरळ राज्याची पुनर्रचना करण्यांत आल्यावर राज्य सरकारच्या नौकरांच्या पगारांत विस्कळीतपणा आला होता. तो नाहींसा करण्यासाठीं वेतन-श्रेणींची पुनर्घटना करण्यांत आली आहे. आतां राज्यांतील सरकारी जागांचे पगार कमींतकमी २५ रुपये व जास्तींत जास्ती १,६०० रुपये असे असतील.

**चीनच्या पुनर्घटनेबद्दल समाधान**—झेकोस्लोव्हाकिआचे पंतप्रधान श्री. सिरोकी ह्यांनीं चीनमधील आर्थिक पुनर्घटनेचें अवलोकन करण्यासाठी त्या देशाचा ३० दिवसांचा दौरा काढला होता. राष्ट्राच्या आर्थिक अभ्युदयासाठी चीनचे लोक एकजुटीनें व उत्साहानें करीत असलेल्या श्रमांचें त्यांनीं कौतुक केलें. त्यांनीं उत्तर व्हिएटनामचाहि दौरा केला.

**कॅन्सरवर यशस्वी औषध ?**—अमेरिकेंतील बाल्टिमोर ह्या शहरांत नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट नांवाची संस्था आहे. ह्या संस्थेचे डायरेक्टर डॉ. हेलर ह्यांनीं प्राथमिक अवस्थेंत असलेल्या कॅन्सरच्या रोग्यांना एक नवीन औषध देऊन बरें केल्याची वार्ता आहे. अमेरिकेंतील डॉक्टरांचें लक्ष ह्या औषधानें वेधून घेतलें आहे.

**कर्नाळ येथें डेअरी कॉलेज**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारतामधील कांहीं मोठ्या शहरांतून शास्त्रीय पद्धतीचे गोळवाडे स्थापन करण्यांत येणार आहेत. ह्या गोळवाड्यांतून काम करण्यासाठी तज्ज्ञ नौकरांची आवश्यकता आहे. अशा नौकरांना शिकवून तयार करण्यासाठी कर्नाळ येथें एक डेअरी कॉलेज स्थापन करण्यांत येणार आहे.

**पंचवार्षिक योजना व स्त्रिया**—अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्ष श्रीमती लक्ष्मी मेनन अहमदाबाद येथें भाषण करतांना म्हणाल्या कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या यशाला स्त्रियांना हातभार लावतां येईल. भारतामधील स्त्रियांनीं देशांतच तयार झालेलीं सौंदर्यप्रसाधनें व कापड वापरलें तर परदेशीय हुंडणावळीची कितीतरी बचत होईल.

तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## कर्जदाराला कर्ज, पण जामीनदाराकडून वसुली !

### सहकारी कायद्याच्या २४ (अ) कलमाच्या अंमलबजावणीचे दुष्परिणाम

लेखक—स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., पुणे

मुंबई सहकारी कायद्याचें कलम २४ अ अन्वयें एखाद्या पगारी अगर रोजंदारीवर असणाऱ्या सभासदाच्या पगाराचा अगर रोजंदारीचा कांहीं भाग सहकारी संस्थेस तिच्या कर्जवसुलीपोटीं अगर मागणीच्या भरपाईसाठी कापून येणें रकमेची अगर मागणीची वसुली करण्यासाठी तरतूद केलेली आहे. सहकारी संस्थेच्या सभासदानें कलम २४ अ मध्यें नमूद केलेप्रमाणें लेख लिहून दिला असल्यास त्या लेखाच्या आधारें सहकारी संस्थेनें येणें रकमेच्या वसुलीकरतां सदर सभासद ज्या खात्यांत नोकरीस असेल त्याच्या वरिष्ठ अंमलदारास रिक्विझिशन पाठवल्यास सदरच्या वरिष्ठ अंमलदारानें सदरच्या सभासद नोकराच्या पगाराचा अगर रोजंदारीचा जो कांहीं भाग लेखांत नमूद केला असेल त्याप्रमाणें रक्कम कापून घेऊन सहकारी संस्थेकडे पाठविलीच पाहिजे. अशा रीतीनें कापून घेतलेला पगाराचा अगर रोजंदारीचा भाग सहकारी संस्थेकडे आल्यावर ती रक्कम सभासदाच्या येणें रकमेच्या भरपाईसाठी सहकारी संस्थेनें दाखविली पाहिजे. कलम २४ अ चा समावेश सहकारी कायद्यांत घालण्याचा प्रधान उद्देश हा कीं सहकारी संस्थांना थकबाकीदार अगर कर्जदार सभासदांचे बाबतींत थकबाकी अगर कर्जवसुलीसाठी अन्य उपाय योजण्याची वेळ येऊं नये हाच होय. कलम २४ अ प्रमाणें केलेली व्यवस्था विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वागतार्हच आहे हें कोणी नाकबूल करणार नाहीं. परंतु या कलमान्वयें अंमलबजावणी करतांना निरनिराळे प्रश्न उपस्थित होऊन झालेली अगर होत असलेली अंमलबजावणी सर्वांस हितावह आहे किंवा काय, अगर कांहीं सभासदांचे हक्कावर व हितसंबंधावर त्यामुळें आक्रमण होत आहे किंवा कसें हें पाहणें अगत्याचें आहे.

### कर्जाचा फायदा कोणास मिळाला ?

सहकारी संस्थांकडून या नियमांची अंमलबजावणी होत असतांना वेगळाच अनुभव अवलोकनांत येतो असें म्हटलें पाहिजे. मुख्य कर्जदार व त्याचे जामीनदार यांची जबाबदारी घेतलेल्या कर्जफेडीबाबत कायद्यानें जरी एकाच स्वरूपाची मानली आहे तरी सहकारी तत्त्वज्ञानाप्रमाणें त्यांत फरक केलेला आहे. मुख्य कर्जदार हा कर्ज घेतांना मिळालेल्या कर्जाचा विनियोग केवळ स्वतःसाठी करीत असतो हें विसरून भागणार नाहीं. जामीनदार हे केवळ आपत्तीच्या प्रसंगीं मुख्य कर्जदारास मदत करावी या भावनेनें व मित्र प्रेमानें प्रेरित होऊन कर्जाची जबाबदारी पत्करतात. मिळालेल्या कर्जांत जामीनदारांच्या वांट्यास कांहींहि आलेलें नसतें. केवळ सहकार्य करावयाचें व आपत्तींत आलेल्या सहकाऱ्यांस मदत करून त्याचें आपत्तीनिवारण करून त्याची सोय करावयाची एवढीच इच्छा त्यांत दिसते. सहकारी न्यायमंडळानें दिलेल्या निवाड्यांत हेंच स्पष्ट दिसतें कीं मुख्य कर्जदार व त्याचे जामीनदार यांनीं घेतलेली कर्जाची जबाबदारी जरी संयुक्त व वैयक्तिक रीत्या त्यांचेवर आहे, तरी कर्जवसुलीच्या वेळीं जामीनदाराकडून प्रथम कर्जवसुली केली जाऊं नये. सहकारी परिषदांत ह्याबाबत बरीच चर्चा व विचारविनिमय होऊन ठरावरूपानें असें निश्चितपणें मांडलें गेलें आहे कीं, जामीनदाराकडून कर्जवसुलीकरतां प्रयत्न करावयाचे अगोदर मुख्य कर्जदार याचे विरुद्ध अंमलबजावणी झाली पाहिजे; मुख्य कर्जदारास हात न लावतां त्याचे जामीनदारांवर कर्जवसुलीबाबत प्रयत्न करणें न्याय्य व वाजवी होणार नाहीं.

### जामीनदारास येणारे विपरीत अनुभव

कलम २४ अ ची अंमलबजावणी करतांना असें स्पष्टपणें अवलोकनांत येतें कीं, मूळ कर्जदार बाजूस ठेवून जामीनदारांमागें कर्जवसुलीचा ससेमिरा लावून त्यांना निष्कारण रकमा भराव्या लागतात. असे विपरीत अनुभव जामीनदारांस आल्यास सहकारी कार्याविषयीं त्यांच्या मनांत द्वेष व चीड निर्माण होते. उदाहरणासाठी आपण असें समजूं कीं एका सहकारी संस्थेंत अ, ब व क असे ३ सभासद आहेत. अ या सभासदास कर्जाची निकड आहे व ब आणि क हे सभासद जामीन राहण्यास कबूल आहेत. अ सभासदानें केलेल्या कर्जमागणीचे अर्जावर ब आणि क हे सभासद जामीनदार आहेत. अ सभासद हा पेशानें व्यापारी असून ब हा पगारी नोकर आहे व क सभासद हाहि धंद्यानें व्यापारी आहे. ह्या तीन सभासदांनीं कर्जरोखा लिहून दिल्यावर व अ सभासदानें कर्जाची उचल केल्यावर कालांतरानें कर्जाची फेड वेळेवर न झाल्यास सहकारी संस्था कर्जवसुलीसाठी अ सभासदाविरुद्ध कांहींहि इलाज न करतां ब सभासद ज्या ठिकाणीं नोकरीस आहे त्याचे वरिष्ठ अंमलदाराकडे ब सभासदानें लिहून दिलेल्या कलम २४ मधील लेखाच्या आधारें ब सभासदाचा पगार कापून घेऊन संस्थेकडे पाठविण्याबद्दल रिक्विझिशन देतात. वर नमूद केलेल्या उदाहरणांत घेतलेल्या कर्जाचा एकहि पैसा जामीनदारास मिळालेला नसतांना व दुसरा जामीनदार व मूळ कर्जदार ह्यांना सदर कर्जफेडीची तोषीस न लावतां सहकारी संस्था व सभासदाच्या पगारांतून कापून आलेल्या रकमेंतून कर्जफेडीची व्यवस्था करतात. ब सभासदास त्याचेकडून वसूल केल्या गेलेल्या रकमेच्या वसुलीसाठी अ व क सभासदांविरुद्ध निष्कारण कायदेशीर इलाज करावा लागतो.

### सहकारी भावनेला धक्का

ही परिस्थिति सहकारी कार्याविषयीं व कार्यपद्धतीविषयीं अप्रीति व द्वेष उत्पन्न करणारी आहे. ह्या कलमाच्या होणाऱ्या अंमलबजावणीमुळें सहकारी संस्थांची कर्जवसुली सुलभपणें होत आहे असें जरी वरवर दिसत असलें तरी सहकारी क्षेत्रांत त्यामुळें असहकाराची वृत्ति येत आहे. ह्या उपक्रमामुळें सहकारी वृत्तीचा लोप होऊन सहकारी कार्याविषयीं प्रेम अगर तळमळ उरणार नाहीं. लवादनिवाड्यांत कर्जदार व जामीनदार ह्यांची जबाबदारी संयुक्त आहे असें जरी मानलें तरी त्याची अंमलबजावणी करतांना मूळ कर्जदार व त्याचे जामीनदार हा फरक लक्षांत घेऊन मूळ कर्जदाराकडून वसुलीचे प्रयत्न आधीं केले जातात. त्याच्या उलट परिस्थिति कलम २४ अच्या अंमलबजावणींत प्रत्यहीं दिसते. ही परिस्थिति अशीच रहावी व त्यामुळें सहकारी कार्यक्षेत्र संकुचित होत जाऊन सहकारी तत्त्वज्ञानाचा अस्त व्हावा असें कोणाहि प्रामाणिक सहकारी कार्यकर्त्यास वाटणार नाहीं. सहकारी संस्थेच्या सभासदांनीं कर्जरोखे लिहून देतांना वरील कलमाचा बारकाईनें विचार करून त्याबाबत योग्य ती दिशा ठरवावी.

('व्यापारी महाराष्ट्र')

---

**तंत्रज्ञांना नव्या नोकऱ्या**—१९५७ च्या मार्च महिन्यांत दामोदर व्हॅली कॉर्पोरेशनमधील २,५६५ तंत्रज्ञांना कामावरून कमी करण्यांत आलें होतें. त्यांपैकी १,६४६ जणांना नव्या नोकऱ्या देण्यांत आल्या. आतां नवी नोकरी मागणारांची संख्या फक्त २५० च राहिली आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १० एप्रिल, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारत व ऑस्ट्रेलिआ ह्यांच्यामधील व्यापार

भारत व ऑस्ट्रेलिआ ह्यांच्या दरम्यानची चालू व्यापारी परिस्थिति नजरेखाली घालून व्यापारी संबंध वाढविण्याची शक्यता अजमावण्यासाठी ऑस्ट्रेलिआचें एक प्रतिनिधि मंडळ भारताचा दौरा करीत आहे. प्रतिनिधि--मंडळांत मोठमोठ्या कारखानदारांचे अधिकारी आणि ऑस्ट्रेलिआंतील प्रमुख बँकांचे अधिकारी ह्यांचा समावेश आहे. मंडळांतील सभासदांची संख्या २७ आहे आणि तें मंडळ भारताची बाजारपेठ म्हणूनहि पहाणी करीत आहे.

प्रतिनिधि--मंडळाचे नेते मि. जॉन हर्ले ह्यांनीं मद्रास येथील पत्रकारांशीं बोलतांना पुढीलप्रमाणें विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, त्यांचा देश लोकसंख्येच्या दृष्टीनें कांहीं फारसा मोठा नाहीं. परंतु गेल्या महायुद्धापासून त्या देशाच्या अर्थ-व्यवस्थेंत बराच फरक झालेला आहे. युद्धापूर्वी ऑस्ट्रेलिआचा निर्यात व्यापार मुख्यत: गहूं आणि लोकर ह्या दोन जिनसांवरच अवलंबून होता. पण युद्धानंतरच्या व युद्धकालांत ऑस्ट्रेलिआनें आपलें औद्योगीकरण केलें. युरोपापासून ऑस्ट्रेलिआ तोडला गेला हेंहि एक कारण औद्योगीकरणाविषयीं सांगतां येईल. परिणाम असा झाला आहे कीं आतां ऑस्ट्रेलिआंत विमानें, मोटारी आणि सर्व प्रकारची भारी यंत्रसामुग्री बनविण्यांत येऊं लागली आहे. त्याशिवाय औद्योगीकरणाच्या वाटेवर असणाऱ्या अर्थ-व्यवस्थेला जी पूरक यंत्रसामुग्री लागते, तींहि आतां तयार होऊं लागली आहे. ह्या क्षेत्रांत भारताशीं ऑस्ट्रेलिआ व्यापारी संबंध प्रस्थापित करूं शकेल. ऑस्ट्रेलिआंतील लोकरीला भारतामध्यें मागणी येऊं लागली आहे. उभयतां देशांतील व्यापाराची वृद्धि करण्यासाठी भारतामधील चहा ह्या वस्तूचा चांगला उपयोग होऊं शकेल. सध्यां ऑस्ट्रेलिआ त्याला लागणारा बहुतेक चहा सीलोन व जाव्हा ह्यांच्याकडून घेतो. भारताकडून अधिक चहा मिळाला तर ऑस्ट्रेलिआला हवा आहे.

भारताला दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या यशासाठी औद्योगिक यंत्रसाहित्याची गरज आहे. भारताची ही गरज कांहीं प्रमाणांत ऑस्ट्रेलिआ पुरवूं शकेल. रेल्वेला लागणारे निरनिराळ्या तऱ्हेचे डबे आणि भारतामधील परिस्थितीला योग्य अशा प्रकारचीं शेतीचीं अवजारें ह्या गोष्टीहि पुरवतां येतील. भारी यंत्रसामुग्री तयार करण्याचे कारखाने भारतांत संयुक्त–मालकीच्या तत्त्वावर काढतां येतील किंवा काय ह्यासंबंधीं भारतीय उद्योगपतींशीं बोलणीं करण्याची ऑस्ट्रेलिआंतील कारखानदारांची तयारी आहे. भारतामधील हातमागाच्या कापडाला ऑस्ट्रेलिआंत बाजारपेठ मिळूं शकेल काय, ह्यासंबंधी प्रतिनिधिमंडळानें कलकत्ता येथें चर्चा केली आहे. हातमागाच्या कापडाचे कांहीं नमुने ऑस्ट्रेलिआंत घेऊन जाऊन किरकोळ विक्रीच्या दुकानांतून ते लोकांना पहाण्यासाठी ठेवण्याचें ठरलें आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील विद्यापीठांतील बरेच हिंदी विद्यार्थी ऑस्ट्रेलिआंतील कंपन्यांतून कामें करीत आहेत. हे विद्यार्थी शिक्षण घेऊन तयार होतील आणि भारताच्या औद्योगीकरणाला मदत करतील ह्यांत शंका नाहीं. भारताच्या औद्योगीकरणाला सर्वांत उत्तम मदत म्हणजे हिंदी लोकांना तांत्रिक शिक्षण देणें ही होय अशी मंडळाची भावना आहे.

---

## ग्रामीण जीवन व औद्योगिक विकास

ब्रिटनमधील मजूरपक्षाचे एक पुढारी, मि. बीव्हन ह्यांनीं भारताच्या औद्योगिक विकासाच्या कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केलें आहे. दिल्ली येथें बोलतांना ते म्हणाले कीं, रशिआंत शेतीची पुनर्घटना करतांना सामुदायिक शेती, यांत्रिकीकरण आणि मध्यवर्ती नियंत्रण ह्या तत्त्वांची कास धरण्यांत आली. पण हे उपाय अयशस्वी ठरल्याची कबुली खुद्द रशिअन पुढाऱ्यांनींच दिली आहे. ग्रामीण जीवनांत त्यामुळें असंतोष फैलावला. रशिआनें केलेल्या चुका करणें भारताला परवडणार नाहीं. शेतीच्या पुनर्घटनेबाबत रशिअन राज्यकर्त्यांनीं ज्या चुका केल्या त्या त्यांना सुधारतां आल्या. कारण रशिआंत ओसाड व निर्मनुष्य जमीन पुष्कळ होती. तशी भारताची स्थिति नाहीं. ग्रामीण जीवनाची चाकोरी फारशी बिघडूं न देतां त्या जीवनाशीं संवादी राहील अशा प्रकारची आर्थिक क्रांति भारताला घडवून आणावयाची आहे. उद्योगधंद्याचा विकास व ग्रामीण जीवनाचा विकास साधण्याच्या कामीं उपयोगी पडेल अशा प्रकारचा कित्ता कोठेंच मिळण्यासारखा नाहीं. ह्या बाबतींत इतिहास मुग्ध आहे ब्रिटनचें उदाहरण चालण्यासारखें नाहीं. कारण, औद्योगीकरण करण्याच्या प्रयत्नांत ब्रिटननें आपलें ग्रामीण जीवनच नष्ट करून टाकलें. औद्योगीकरणाच्या कालांत ब्रिटनमधील ग्रामीण जीवनांत इतकी उलथापालथ झाली कीं, ब्रिटनच्या मालकीच्या वसाहती नसत्या तर तेथें राजकीय क्रांति केव्हांच घडून आली असती. ग्रामीण जीवनाचा नाश न करतां औद्योगीकरण साधण्याचा मार्ग भारतानें शोधून काढला आहे असें वाटतें.

---

## लंडनमधील नव्या 'सुपर' बसेस

लंडनमध्यें सध्यां चालू असलेल्या बसेस १९३० च्या मॉडेलच्या आहेत. त्यांची जागा घेणाऱ्या नव्या बसेस अद्ययावत् असतील. ऑटोमॅटिक गिअर चेंजिंग व पॉवर असिस्टेड स्टिअरिंग, हीं त्यांचीं वैशिष्ट्यें रहातील. एकदां बसचें इंजिन सुरू झालें, कीं ड्रायव्हरला फक्त दोन कंट्रोल्सकडे लक्ष द्यावें लागेल : अक्सिलरेटर व ब्रेक. वेग कमी–जास्त होईल त्याप्रमाणें व चढ–उताराप्रमाणें गिअर्स आपोआप बदललीं जातील. खालच्या व वरच्या, दोन्हो मजल्यावर हीटर्स असतील; सध्यांच्या बसेसमध्यें हवा सुखद करण्याची कोणतीहि सोय नाहीं. १९५९ मध्यें ह्या नव्या बसेस चालू होतील; ८५० बसेस तयार करण्याचें कंत्राट देण्यांत आलें आहे.

### सभ्यता व शिष्टाचार शिकविणारीं पुस्तकें

सभ्यता व शिष्टाचार शिकविण्याच्या पुस्तकांची फक्त भारतांतच गरज आहे असें नाहीं. ह्या विषयासंबंधीं पश्चिम जर्मनी व रशिया ह्यांनाहि नव्यानें आस्था वाटूं लागली असून दोन्ही देशांत सभ्यता शिकविणारीं दोन पुस्तकें नुकतीच प्रसिद्ध झालीं आहेत. सभ्य आचारासंबंधींची उभयतां देशांतील गरज मात्र निरनिराळ्या परिस्थितींतून उद्भवलेली आहे. रशिआंत क्रांति झाल्यानंतर तेथील कामगारवर्ग व शेतकरीवर्ग प्रतिष्ठा पावला. परंतु सभ्य समाजांत कशा रीतीनें वागावें, ह्याचें ज्ञान ह्या वर्गातील लोकांना नव्हतें. तें देण्याची गरज आतां तेथील राज्यकर्त्यांना वाटूं लागल्याचें दिसतें. रशिआंतील मुत्सद्दी व राजकारणी सुद्धां पुष्कळदां आढदांडपणानें वागतात अशी तक्रार कधीं कधीं करण्यांत येते. शिष्टाचार व सभ्यता शिकविणारें ६५ पानांचें पुस्तक रशिआंत प्रसिद्ध करण्यांत आलें असून त्याचा चांगला खप होत आहे. जर्मनींतील युद्धकालीन तरुणांना शालेय शिक्षण असें लाभलें नाहीं. त्यामुळें त्या देशांतील तरुण मुत्सद्यांना शिष्टाचाराच्या वागणुकीची फारशी तोंडओळख नाहीं. दुसऱ्याहि एका जर्मन वर्गाला शिष्टाचार शिकण्याची आवश्यकता वाटत आहे. गेल्या कांहीं वर्षांत जर्मनीची आर्थिक भरभराट झपाट्यानें होत आहे. ह्या भरभराटीच्या लाटेवर आरोहण करून धंदेवाल्यांनीं व उद्योगपतींनीं खूप पैसा कमावला पण वरिष्ठ अशा युरोपीय समाजांत वागतांना एकदम श्रीमंत झालेला हा वर्ग भांबावतो. त्याची अडचण दूर करण्यासाठी जर्मनीच्या परराष्ट्रखात्यांतील एका स्त्रीनें ५१५ पानांचें पुस्तक प्रकाशित केलें आहे.

---

### हातमाग उत्पादनांत वाढ

'हातमागाच्या कापडाच्या अंदाजें उत्पादनांत १९५६ मध्यें ६८ दशलक्ष वारांनीं वाढ झाली. ही गोष्ट उत्तेजक असली तरी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखाली या कापडाच्या उत्पादनाचें जें लक्ष्य ठरविण्यांत आलें आहे तें गांठावयाचें झाल्यास १९५७-५८ मध्यें तें ३०० दशलक्ष वारांपर्यंत वाढलें पाहिजे,' असे उद्गार भारत सरकारचे टेक्स्टाईल कमिशनर श्री. व्ही. नंजाप्पा यांनीं पुनर्घटना झालेल्या अ. भा. हातमागमंडळाच्या मुंबई येथें १ एप्रिल रोजीं भरलेल्या पहिल्या बैठकीच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत काढलें. हातमाग कापडउत्पादनांत वाढ करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करण्यांत यावे, अशी कळकळीची विनंति त्यांनीं राज्य सरकारांना केली.

### सोन्याचें जागतिक उत्पादन

( रशिया वगळून )

( आकडे हजार औंसांचे आहेत )

| | १९५२ | १९५३ | १९५४ | १९५५ | १९५६ | १९५५ चे मानानें १९५६ मध्यें % वाढ (+) किंवा घट(−) |
|---|---|---|---|---|---|---|
| द. आफ्रिका | ११,८१९ | ११,९४१ | १३,२३७ | १४,६०१ | १५,८९१* | +८.८ |
| कॅनडा | ४,४७२ | ४,०५६ | ४,३६६ | ४,५४२ | ४,३७९* | −३.६ |
| अमेरिका | १,९२७ | १,९७० | १,८५९ | १,८७७ | १,८५०* | −१.४ |
| ऑस्ट्रेलिया | ९८० | १,०७५ | १,११८ | १,०४९ | १,०४५* | −०.४ |
| गोल्ड कोस्ट | ६९१ | ७३१ | ७८७ | ६८७ | ६३८ | −७.१ |
| द. ऱ्होडेशिया | ४९७ | ५०१ | ५३६ | ५२५ | ५३५* | +१.९ |
| फिलिपाइन्स | ४६९ | ४८१ | ४१६ | ४१६ | ४००* | −३.८ |
| मेक्सिको | ४५९ | ४८३ | ३९६ | ३७९ | ३५०* | −७.७ |
| कोलंबिया | ४२२ | ४३७ | ३७७ | ३८१ | ४४०* | +१५.५ |
| कोंगो | ३६९ | ३७१ | ३६५ | ३७० | ३५०* | −५.४ |
| जपान | २२८ | २५८ | ३०० | २८९ | २९०* | +०.३ |
| भारत | २५३ | २२३ | २४१ | २११ | २००* | −५.२ |
| ब्राझील | १६० | १४७ | १५३ | १४१ | १६०* | +१०.३ |
| चिली | १७७ | १३१ | १२५ | १२३ | ८५* | −३०.९ |
| पेरू | १३५ | १४० | १४७ | १६३ | १५०* | −८.० |
| न्यूगिनी | १२७ | १२१ | ८६ | ७४ | ७०* | −५.४ |
| फिजी | ७८ | ७७ | ७२ | ७४ | ७०* | −५.४ |
| टांगानिका | ६५ | ७४ | ७४ | ६९ | ६०* | −१३.० |
| स्वीडन | ६६ | ८८ | ११० | १०० | १००* | — |
| न्यूझीलंड | ५९ | ३९ | ४२ | २७ | २५* | −७.४ |
| इतर | १,१३९ | १,१६२ | १,०६६ | १,०२२* | १,०१२* | −१.० |
| एकूण ( रशिया वगळून ) | २४,५९२ | २४,५०६ | २५,८७३ | २७,१२४ | २८,१००* | + ३.६ |
| ब्रि. साम्राज्य | १९,१०४ | १८,८९५ | २०६२२ | २१,९२४ | २२,९८०* | + ४.८ |
| ब्रि. साम्राज्याचा हिस्सा % | ७७.७ | ७७.१ | ७९.७ | ८०.८ | ८१.८ | |
| द. आफ्रिकेचा हिस्सा % | ४८.१ | ४८.७ | ५१.२ | ५३.८ | ५६.६ | |

* अंदाजी आंकडा

## शेड्यूल्ड बँकांच्या कर्जांत वाढ

ऑगस्ट, १९५६ ते जानेवारी, १९५७ ह्या मुद्दतीमध्यें शेड्यूल्ड बँकांनीं प्रमुख प्रकारच्या तारणावर दिलेल्या कर्जांची छाननी येथें देण्यांत आली आहे. कर्जांत मोसमी वाढ अथवा घट झाली असली, तरी कर्जांची एकूण रकम गेल्या पांच वर्षांचे मानानें ज्यास्तच झालेली आहे. कर्जांची वाढती मागणी, उत्पादनांत वाढ, परदेशी व्यापारांत वाढ आणि चढीच्या किंमती ह्या सर्वांचा हा परिणाम आहे. औद्योगिक उत्पादनाचा इंडेक्स १९५४ मध्यें ११२.९ होता, तो १९५५ मध्यें १२२.१ झाला; आणि १९५६ मध्यें तर १४३.६ वर गेला. मालाच्या वॅगन्सची वहातुक १९५५ चे मानानें १९५६ मध्यें ५% जास्त झाली. १९५६ च्या पहिल्या सहामाहींत निर्गत २९१ कोटी रुपयांची व आयात ३९६ कोटी रुपयांची झाली होती; दुसऱ्या सहामाहीचे तत्सम आकडे अनुक्रमें ३०६ कोटी रुपये व ४११ कोटी रुपये असे होते. १९५६ ह्या वर्षांत घाऊक किंमतींचा इंडेक्स १३% नें वर गेला. अन्नधान्यें व औद्योगिक कच्चा माल ह्यांच्या किंमती अनुक्रमें २०% नें व १७% नें वाढल्या. ह्या सर्वांचा परिणाम बँकांकडील कर्जमागणींत वाढ होण्यांत झाला.

ऑक्टोबर–एप्रिल ह्या मोसमांत बँकांच्या कर्जांत दरसाल वाढ होते, व त्यानंतरच्या सहा महिन्यांत घट होते. तथापि, आतां देशांतील आर्थिक व औद्योगिक उलाढालींत वाढ झाली असल्यामुळें, कर्जांच्या मोसमी वाढींच्या प्रमाणांत पुनः घट होत नाहीं, असें दिसून येतें:—

कर्जांची वाढ व घट

( आकडे कोटी रुपयांचे )

| वर्ष (१) | तेजीच्या मोसमांतील वाढ (२) | मंदीच्या मोसमांतील घट (३) | (३) चें (२) शीं प्रमाण |
|---|---|---|---|
| १९५२–५३ | ८१.९ | ७९.८ | ९७.४ |
| १९५३–५४ | १०७.५ | ४२.५ | ३९.५ |
| १९५४–५५ | १०३.० | ३५.३ | ३४.३ |
| १९५५–५६ | १७६.४ | ८.३ | ४.७ |
| १९५६–५७ २५-१-५७ पर्यंत | ६५.७ | — | — |

( दिलेलीं कर्जें; आंकडे लक्ष रुपयांचे )

| माल | मे ११, १९५६ | जुलै २७, १९५६ | ऑक्टो. २६, १९५६ | जाने. २५, १९५७ |
|---|---|---|---|---|
| १. अन्नधान्यें | ३६,४७ | ३०,५७ | १३,६९ | २४,२५ |
| (१) भात व तांदूळ | २४,७६ | ११,६९ | ४,३४ | १६,१३ |
| (२) गहूं, हरबरा इ. | ११,७१ | १८,८८ | ९,३५ | ८,१२ |
| २. औद्योगिक कच्चा माल | ९७,४३ | ७५,४० | ५७,०६ | ९६,६१ |
| (१) भुईमूग | ९,५० | ३,२५ | ७१ | १०,७७ |
| (२) कच्चा ताग | १२,२९ | ७,८४ | ८,९१ | १७,९६ |
| (३) कपास | ५४,७१ | ४७,८३ | ३४,८४ | ५४,०४ |
| ३. मळ्यांचा माल | ३४,०३ | ३०,८९ | ३०,८६ | २८,५० |
| (१) चहा कॉफी, रबर. | २८,८२ | २६,६९ | २७,९३ | २६,४८ |
| ४. पक्का माल व खनिजें | २१९,४७ | २,३३,३४ | २,४८,३४ | २,७३,०५ |
| (१) कपास कापड | ५५,६५ | ६१,१४ | ७२,५७ | ८४,८२ |
| (२) ताग कापड | १५,४१ | १६,४१ | १९,२६ | २०,३९ |
| (३) साखर व गूळ | ५४,६० | ४६,१८ | २९;१० | ३५,३९ |
| (४) लोखंड, पोलाद इंजिनिअरिंग | ५१,९३ | ६२,५५ | ७७,४४ | ८०,७० |
| ५. इतर तारण | १,७४,०३ | १,६०,८४ | १,९५,५३ | १,८६,४६ |
| (१) सरकारी व इतर रोखे | ३९,२६ | ३५,९५ | ६१,११ | ५५,०६ |
| (२) कंपन्यांचे शेअर्स व डिबेंचर्स | ५६,४१ | ६०,१७ | ७२,३८ | ६९,९१ |
| १ ते ५ ची बेरीज | ५,६१,४३ | ५,१३,०४ | ५,४५,४८ | ६,०८,८६ |

## फलंदाजाला २५,००० रुपयांचा चेक

जिम लेकर ह्या इंग्लंडच्या ऑफ्-स्पिन गोलंदाजाला २५,००० रुपयांचा चेक नुकताच बक्षिस देण्यांत आला. ऑस्ट्रेलियाविरुद्ध इंग्लंडच्या, गेल्या वर्षांतील चौथ्या कसोटीच्या सामन्यांत लेकरनें ऑस्ट्रेलियाचे १९ गडी बाद करण्याचा विक्रम केला, त्यानिमित्त हा गौरव होता. 'दि पीपल्' ह्या साप्ताहिकाच्या वाचकांनीं जमविलेल्या रकमेचा तो चेक होता. 'जिम लेकरच्या तोडीचा ऑफ्–स्पिनर अद्याप झालाच नाहीं' असे उद्गार चेक नजर करतेवेळीं इंग्लंडच्या निवड-मंडळाचे चेअरमन, जी. ओ. ॲलन, ह्यांनीं काढले. फलंदाजाच्या अगदीं जवळ घेटोळें करून उभें रहाणाऱ्या क्षेत्ररक्षकांच्या सहकार्याचा जिम लेकरनें आपल्या आभाराच्या भाषणांत कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

## ग्रेटब्रिटननें अमेरिकेची उसनी घेतलेली चांदी परत केली

ग्रेट ब्रिटननें अमेरिकेकडून कांहीं वर्षांपूर्वी ८८० लक्ष औंस चांदी उसनी घेतली होती, ती हप्त्याहप्त्यानें फेडण्यांत आली. शेवटचा हप्ता ( ८६ लक्ष रु. किंमतीच्या चांदीचे २३४३ पांटले ) 'क्वीन इलिझाबेथ' ह्या ब्रिटिश आगबोटीनें अमेरिकेला नुकतेच पोंचविले. जेव्हां ग्रेट ब्रिटननें चांदी उसनी घेतली, तेव्हां तिची किंमत बाजारभावानें २९.८ कोटी रु. होती. आजच्या बाजारभावाप्रमाणें तिची किंमत ३७.५ कोटी रु. भरते.

## पोस्टाच्या दरांतील बदलाचें समर्थन

पत्रांना पूर्वी २ आणे हंशील पडत असे, तें आतां १३ नये पैसे करण्यांत आलें आहे. त्याचें समर्थन पोस्ट खात्यानें असें केलें आहे कीं, २ आणे म्हणजे बरोबर १२.५ नये पैसे होतात; १२ नये पैसे हंशील ठरवलें असतं तर पोस्टखात्याला ४२ लक्ष रुपये नुकसान आलें असतें. म्हणून, १३ नये पैसे हंशील घेण्यांत येत आहे. ह्या उलट, बुक-पॅटर्न व सँपल पॅकेट्सवर पांच तोळ्याला १ आण्याऐवजीं ( ६.२५ नये पैसे ) ६ नये पैसे आकारणी करण्यांत येत आहे, आणि त्यापुढील प्रत्येक २½ तोळ्यांना ६ पै ऐवजीं ( ३.१२५ नये पैसे ) ३ नये पैसे घेण्यांत येत आहेत. त्यामुळें, पोस्टखात्याचें ३८ लक्ष रुपये नुकसान होणार आहे.

## जागतिक बँकेचें 'अतिपूर्व' खातें

जागतिक बँकेचें काम ब्रह्मदेश, चीन, सीलोन, इंडोनेशिया, थाइलंड, जपान, कोरिया, फिलिपाइन्स, व्हिएटनाम, ह्या देशांतून बरेंच वाढलें आहे. त्यासाठी बँकेनें 'अतिपूर्व' खातें वेगळें काढून त्यावर मि. मार्टिन रोसेन ह्यांची डायरेक्टर म्हणून नेमणूक केली आहे. बँकेचें सध्यांचें 'आशिया व मध्यपूर्व' खातें आहे; त्याकडे अफगाणिस्तान, इजिप्त, इथिओपिया, भारत, इराण, इराक, इस्राएल, जॉर्डन, लेबेनॉन, पाकिस्तान व सिरिया ह्या देशांबाबत काम राहील.

---

## बिस्किटांच्या निर्गतीला रिबेटची मदत हवी

भारतांत १९५६ मध्यें १२,०२२ टन बिस्किटांचें उत्पादन झालें, पण कारखान्यांची उत्पादनशक्ति ४०,००० टन आहे. गेल्या वर्षीपेक्षा उत्पादनांत वाढ झाली असली, तरी फक्त २५ कारखाने वर्षभर चालू राहिले. कच्च्या मालाच्या किंमती इतर देशांतील किंमतींच्या मानानें भारी असल्याकारणानें, हिंदी बिस्किटांची निर्गत होऊं शकत नाहीं. कच्च्या मालाच्या किंमतीमधील ही तफावत लक्षांत घेऊन तिच्या प्रमाणांत बिस्किटांच्या निर्गतीस रिबेट मिळण्यांत यावा, अशी मागणी फेडरेशन ऑफ बिस्किट मॅन्युफॅक्चरर्स ऑफ इंडियानें एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलकडे केली आहे.

---

## श्री. हंडु ह्यांची ग्रॅच्युइटी

स्टेट बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. हंडु हे सेवानिवृत्त झाले. त्यांना २ लक्ष रुपये ग्रॅच्युइटी देण्याचें बँकेच्या डायरेक्टर बोर्डानें ठरविलें. परंतु भारत सरकारनें त्याला अद्याप मान्यता दिलेली नाहीं. डायरेक्टर बोर्डानें मंजूर केलेल्या २ लक्ष रु. पैकी ५० हजार रुपये त्यांना प्रत्यक्ष देण्यांत आले आहेत व बाकीच्या रकमेबद्दल सरकारनें अद्याप निर्णय घेतलेला नाहीं. श्री. हंडु ह्यांना मिळावयाचें १,००० रु. पेन्शन व २०० रु. महागाई भत्ता हीं कायम आहेत.

---

**म्हैसूरच्या राज्यांत लोखंडाच्या खाणी**—म्हैसूर राज्यांतील पूर्वीच्या सांडूर संस्थानच्या हद्दींत लोखंडाच्या खाणी विपुल प्रमाणांत आहेत, असें मत एका रशिअन तज्ज्ञानें व्यक्त केलें आहे. त्याच्या मतानें येथील लोखंडाच्या मातींतील लोखंडाचा अंश ७० टक्क्या इतका आहे. जगांतील चांगल्यांत चांगल्या खाणींतील मातींत हें प्रमाण ६० टक्के असतें.

**कुटुंबनियोजनासंबंधीं फेरविचार**—मुंबई राज्याच्या निवडणुकीपूर्वीच्या सरकारनें कुटुंबनियोजनासाठी कृत्रिम साधनें वापरण्यास आपला विरोध व्यक्त केला होता. नव्यानें अधिकारावर येणारें सरकार ह्या प्रश्नाचा फेरविचार करणार आहे, असें मुख्य मंत्री श्री. चव्हाण ह्यांनीं विधानसभेंत सांगितलें.

**सोन्याच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण**—रायचूर जिल्ह्यांत हात्ती येथें असलेल्या सोन्याच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करण्याचें म्हैसूर राज्य सरकारनें ठरविलें आहे. आंध्र व म्हैसूर राज्यांच्या दरम्यान ह्यासंबंधीं करार झाला असून आंध्र सरकारनें ६४ लाख रुपये किंमतीचे भाग म्हैसूर सरकारच्या नांवावर वर्ग करण्याचें कबूल केलें आहे.

**जागतिक बँकेचें नवें खातें**—अतिपूर्वेकडील देशांची सोय व्हावी म्हणून जागतिक बँकेनें त्या भागासाठी एक नवें खातें उघडलें आहे. ब्रह्मदेश, चीन, सीलोन, इंडोनेशिआ, जपान, कोरिआ, फिलीपाइन्स, सयाम व व्हिएटनाम ह्या देशांतील जागतिक बँकेचे व्यवहार ह्या खात्यातर्फे चालतील.

**मॉस्को येथील युवक महोत्सव**—मॉस्को येथें २८ जुलै ते ११ ऑगस्टपर्यंत आंतरराष्ट्रीय युवक महोत्सव साजरा करण्यांत येणार आहे. महोत्सवांत निरनिराळ्या देशांतील ३०,००० युवक-युवती भाग घेणार आहेत. भारतातर्फे सुमारें १,००० प्रतिनिधी जातील, असें समजतें.

**कॅन्सरच्या रोग्यांसाठी दालन**—कोइमतूर येथील कुपुस्वामी नायडू स्मारक इस्पितळांत कॅन्सरच्या रोग्यांवर उपचार करण्यासाठी एक नवें दालन खुलें करण्यांत आलें. दालनांत ३६ रोग्यांची सोय होऊं शकेल. भारताच्या आरोग्य-मंत्री राजकुमारी अमृतकुवर ह्यांनीं नव्या दालनाचें उद्घाटन केलें.

**कम्युनिस्ट मंत्र्यांचे पगार**—दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर भारतांत केरळ राज्यांत पहिलें कम्युनिस्ट मंत्रिमंडळ अधिकारावर आलें आहे. मंत्रिमंडळाचे सभासद मासिक ३५० रुपये पगार घेणार आहेत. पूर्वीच्या काँग्रेस मंत्रिमंडळांतील सभासद ७५० रुपये घेत असत.

**अमेरिकन बँकवाल्याचें मत**—बोस्टन येथील फर्स्ट नॅशनल बँकेच्या उपाध्यक्षांनीं, भारतांत अमेरिकन भांडवल गुंतविण्याविषयीं अनकूल उद्गार काढले आहेत. त्यांच्या मतानें भारताचें औद्योगीकरण झपाट्यानें होत असून फायद्याचें प्रमाणाहि भरपूर आहे.

---


दि
# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

## खेळतें भांडवल ७॥ कोटींचे वर

★ बचत करून स्वतःचें व राष्ट्राचें हित साधा.
★ व्याजाचे दर वाढविल्यानें आपले उत्पन्नांत भर.
★ सेव्हिंग्ज ठेवींवर व्याज द. सा. द. शें २ टक्के.

—मुदतीच्या ठेवी—

| मुदत | दर |
|---|---|
| १ ते २ वर्षें | ३ टक्के |
| ३ वर्षें | ३। टक्के |
| ५ वर्षें | ३॥ टक्के |

रु. १०,०००/– व त्यावरील रकमा ३ ते ६ महिने मुदतीसाठी आकर्षक व्याजाच्या दरांनीं स्वीकारल्या जातात. तसेंच मोठ्या रकमा पांच वर्षांपेक्षा दीर्घ मुदतीसाठींहि विशेष दरांनीं स्वीकारल्या जातात.

दरासाठी चौकशी करावी.

मुख्य कचेरी :
थोरले बाजीराव रस्ता,
पुणें २.

चिं. वि. जोग
बी. कॉम्., एफ्. आय. बी. (लंडन)
मॅनेजर

## सरकारी खर्चाच्या हिशेबाची तपासणी

देशाच्या कारभारासाठी जनतेच्या पैशांतून मोठमोठ्या रकमा खर्चण्यास संसदेला मंजुरी द्यावी लागत असल्यानें, हा खर्च योग्य प्रकारें व काटसकरीनें झाला आहे वा नाहीं याचा तपशीलवार हिशेब यथाकालांत संसदेस हे हिशेब देणारी यंत्रणा अंमलबजावणी खात्यास जबाबदार न राहतां संसदेसच जबाबदार असावी हें उघड आहे. अशी यंत्रणा बहुतेक सर्व लोकशाही देशांत असते. फ्रान्समध्यें तिला कोर्ट ऑफ अकाउंटस तर इंग्लंड व भारतांत कॉम्प्ट्रोलर अँड ऑडिटर–जनरल असें म्हणतात.

### कॉम्प्ट्रोलर अँड ऑडिटर जनरल

भारतांत कॉम्प्ट्रोलर अँड ऑडिटर–जनरलची नेमणूक राष्ट्रपति करतात व त्यावर अंमलबजावणी खात्याचें नियंत्रण असूं शकत नाहीं. त्याला ऑफिसर ऑफ् पार्लमेंट असें म्हणतां येईल. तो वार्षिक हिशेबांची संपूर्ण तपासणी करतो आणि कांहीं आक्षेपार्ह गोष्टींची दखल घेऊन हा खर्च बरोबर असल्याचा दाखला देऊन आपला अहवाल संसदेस सादर करतो. त्याच्या अहवालांत सदोष अर्थसंकल्प व सर्चाचे गैर प्रकार, तसेंच कारभाराची अकार्यक्षमता, उधळपट्टी व निरर्थक खर्च यावरहि टीका असते. हे अहवाल घटनेच्या १५१ व्या कलमानुसार राष्ट्रपतींना संसदेपुढें सादर करावे लागतात,

### कमिटी ऑन पब्लिक अकाउंटस

हे हिशेब व अहवाल अनेक खंडांत छापतात व त्यांची पृष्ठसंख्या शेंकड्यांनींच मोजावी लागेल. संसदेला हे हिशेब तपशीलवार पाहणें शक्य नसतें व तेवढा वेळहि नसतो आणि म्हणून हे अहवाल नीट तपासून पाहण्यासाठी संसद एक समिति नेमते. तिलाच कमिटी ऑन पब्लिक अकाउण्टस असें नांव आहे.

### समितीची घटना

संसदेचीं दोनहीं सभागृहें दर आर्थिक वर्षासाठी ही समिति निवडतात. या समितींत लोकसभेंतील १५ व राज्यसभेंतील ७ मिळून २२ सदस्य असतात.

१९५४–५५ पर्यंत या समितींत १५ सदस्य असत व ते दरवर्षी लोकसभा निवडीत असे. १९५४–५५ पासून या समितींत राज्यसभेचे ७ सदस्य घेण्यास सुरवात झाली. समितीचें सदस्यत्व सभागृहांतील पक्षोपपक्षांच्या संख्याबलानुसार ठरविण्यांत येतें. अशा रीतीनें समिती सर्वपक्षीय असते. अर्थातच तीवर सरकारी पक्षाचे सदस्य जास्त असतात. तथापि हिशेब तपासतांना कोणताहि सदस्य पक्षाचा विचार करीत नाहीं. उपसभापतीच जर या समितीवर असेल तर त्याचीच या समितीच्या अध्यक्षपदावर नेमणूक करण्यांत येतें.

### समितीपुढील कामें

संसदेनें खर्च करण्यास मंजुरी दिलेल्या रकमांचा हिशेब तपासणें हें या समितीचें मुख्य काम आहे. कॉम्प्ट्रोलर अॅण्ड ऑडिटर–जनरलनें सादर केलेला अॅप्रोप्रिएशन अकाउण्टस व ऑडिट रिपोर्ट हाच समितीच्या कामाचा आधार आहे. संसदेनें एकाद्या विशिष्ट गोष्टीसाठी जितकी रक्कम मंजूर केली होती तितकीच व त्याच कारणास्तव खर्च झाली आहे कीं नाहीं याची समिति तपासणी करते. त्याचप्रमाणें हा खर्च करण्यांत शहाणपण, सचोटी व काटकसर दाखविण्यांत आली कीं नाहीं हेंहि समिति पाहतें. नुकसानीच्या आवश्यक खर्चांच्या व गैरकायदा खर्चांच्या प्रकरणांवर समिति सडकून टीका करते. दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन यासारखीं सरकारी कॉर्पोरेशनें, ट्रेडिंग अॅण्ड मॅन्युफॅक्चरिंग स्कीम्स, हिंदुस्तान एअर क्राफ्ट लि., सिंद्री फर्टीलायझर लि. यासारख्या स्वयंशासित वा निमस्वयंशासित संस्था यांचे हिशेब व कॉम्प्ट्रोलर अॅण्ड ऑडिटर–जनरलचे त्यावरील अहवालहि समितीच्या कामकाजाच्या कक्षेत येतात. तसेंच मंजुरीपेक्षा जास्त खर्च झालेल्या प्रकरणांचीहि चौकशी समितीला करावी लागते.

### समितीला भरपूर अधिकार

या समितीला आपलें कामकाज चोखपणें बजावितां यावें म्हणून तिला भरपूर अधिकार दिलेले आहेत. दस्तऐवज मागविणें, फाइली तपासणें व संबंधित व्यक्तींना भेटावयास बोलावून त्यांच्या साक्षी नोंदविणें समिति करूं शकते.

धोरणविषयक बाबींशीं समितीचा संबंध नसतो, तर ठरवून दिलेल्या धोरणाची अंमलबजावणी झाली आहे वा नाहीं हें समिति पाहते. सर्वसाधारण धोरणावर समितीला मत नसलें तरी ठरवून दिलेलें धोरण पार पाडतांना मर्यादातिक्रमण झालें किंवा काय, तसेंच मूळ धोरणांतच कांहीं दोष आहेत किंवा कसें यासंबंधीं समितीला मत व्यक्त करतां येतें.

समितीला प्रत्यक्ष कारभारांत हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसला तरी सरकारच्या निदर्शनास आणून दिलेल्या गैर प्रकरणांत सरकारनें कोणती उपाययोजना केली व तशी केली असल्यास ती पुरेशी आहे कीं नाहीं तें समितीला सांगतां येतें.

साक्षीदारांना प्रश्न विचारून समिति एकाद्या प्रकरणाचा परामर्ष घेते. समितींतील सदस्य साक्ष देणाऱ्या व्यक्तींइतके संबंधित विषयाचे तज्ज्ञ नसले तरी अनुभवानें व अभ्यासानें तसेंच आपल्या वस्तुनिष्ठ व चिकित्सावादी दृष्टिकोनामुळें या साक्षीदारांची ते कसून तपासणी घेऊं शकतात.

### अध्यक्षांची जबाबदारी

समितीच्या बैठकींत अधिकांशानें भाग अध्यक्षाचा असतो. तो सर्व बैठकींस उपस्थित राहतो. बाकीचे सदस्य इतक्या नियमितपणें बैठकीला उपस्थित नसतात. संबंधित विषयांबद्दल त्याला कॉम्प्ट्रोलर अॅण्ड ऑडिटर जनरलकडून व चिटणीसाकडून आवश्यक ती माहिती मिळालेली असते. तो साक्षीदारास प्रथम प्रश्न विचारून त्यापुढें प्रमुख मुद्दे मांडतो; तसेंच निरर्थक प्रश्न विचारणाऱ्या इतर सभासदांस तो पायबंद घालतो.

समितीपुढें उघड झालेल्या वस्तुस्थितीनुसार ती आपल्या शिफारसी करते वा निष्कर्ष काढते व एका अहवालाच्या स्वरूपांत संसदेला सादर करते. त्यानंतर सदर अहवाल जाहीर होऊन त्यास सर्वत्र प्रसिद्धि मिळते.

### समितीच्या शिफारशींचें महत्त्व

संसदेला अहवाल सादर केल्यानंतर समितीचें काम संपतें तर तिच्या परिश्रमांचें कांहींच मूल्य राहणार नाहीं. समितीला आपल्या शिफारशी अंमलबजावणी खात्याकडून प्रत्यक्षांत उतरविण्याचे अधिकार नसले तरी सरकार त्यावर कळकळीनें, प्रामाणिकपणें विचार करतें. आपल्या शिफारशींचा सरकार कितपत स्वीकार करतें वा अंमलबजावणी करतें त्यावर समितीचें लक्ष असतें. या समितीच्या बहुतेक सर्व शिफारशींचा सरकारकडून स्वीकार व अंमलबजावणी होत असतें. जेव्हां एकादी शिफारस सरकार स्वीकारूं शकत नाहीं तेव्हां त्याचीं कारणें समितीला विचारासाठी कळविण्यांत येतात. तदनंतर सरकारचा दृष्टिकोन लक्षांत घेऊन समिति त्यावर फेरविचार करते व जे कांहीं मतभेद राहिले असतील ते शक्य तों दूर करण्यांत येऊन मतैक्य निर्माण होतें. इतके करूनहि मतभेद राहिला तर समिति

त्याकडे अहवालांत लक्ष वेधून संसदेस आवश्यक ती उपाययोजना करण्यास सांगतें. समितीच्या अहवालावर संसद् चर्चा करीत नाहीं.

अशा स्वरूपाच्या समितीद्वारां कारभारावर प्रभावी नियंत्रण राहातें वा नाहीं यावर दुमत असूं शकेल. परंतु इंग्लंडसारख्या लोकशाहीप्रधान देशांत हळूहळू ही यंत्रणा विकसित होत गेली असून, इतर अनेक देश तिचा परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करून स्वीकार करीत आहेत. इतर पद्धतींच्या साहचानें सरकारी खर्चावर नियंत्रण आणण्यांतील फायदे कांहींहि असोत, आपल्या देशांतील या पद्धतीमुळें चर्चा करून निर्णय घेणें सुलभ जात आहे हें खरें.

---

## मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची पुनर्घटना

### "बाँबे स्टेट को. युनियन"

बाँबे प्रॉ. को. इन्स्टिट्यूटची विशेष साधारण सभा दि. १३ एप्रिल रोजीं भरणार आहे. त्यावेळीं इन्स्टिट्यूटच्या बायलॉजमध्यें दुरुस्ती करण्यांत येईल. 'प्रॉव्हिन्शिअल' या शब्दाऐवजीं 'स्टेट' व 'इन्स्टिट्यूट' या शब्दाऐवजीं 'युनिअन' हा शब्द येईल. म्हणजे, इन्स्टिट्यूटचें नवें नांव "बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह युनियन" असें होईल.

### जिल्हा व डिव्हिजनल बोर्डें

'युनिअन'चें कामकाज डिस्ट्रिक्ट व डिव्हिजनल को-ऑपरेटिव्ह बोर्डांमार्फत चालेल. राज्याचा जिल्हा, हें डिस्ट्रिक्ट को. बोर्डाचें कार्यक्षेत्र राहील. जिल्हाबोर्डांचीं खालीलप्रमाणें डिव्हिजनल बोर्डें होतील:—(१) महाराष्ट्र (२) गुजरात (३) सौराष्ट्र, कच्छ धरून (४) मराठवाडा (५) विदर्भ. ग्रेटर बाँबे को. बोर्ड हें स्वतंत्र घटक म्हणून युनियनला जोडलें जाईल.

### एक्झिक्यूटिव्ह कमिटी

एक्झिक्यूटिव्ह कमिटींत २४ सभासद् असतील:—

१० महाराष्ट्र, गुजरात, सौराष्ट्र (कच्छ धरून), विदर्भ आणि मराठवाडा डिव्हिजनल बोर्डांचे प्रत्येकी २ प्रतिनिधी, त्यांपैकी एक तरी डिस्ट्रिक्ट को–बोर्डाचा डिव्हिजनल बोर्डाच्या मॅनेजिंग कमिटीवरील प्रतिनिधी असेल.

१ ग्रेटर बाँबे को. बोर्डाचा प्रतिनिधी.

३ सेंट्रल फिनॅन्सिंग एजन्सीजचे, (स्टेट फिनॅन्सिंग एजन्सीज वगळून) ज्यांचें कार्यक्षेत्र जिल्ह्यापेक्षा कमी नाहीं अशांचे, प्रतिनिधी.

१ बायलॉ ४ (५) मध्यें नमूद केलेल्या सोसायटयांचा प्रतिनिधी.

३ वैयक्तिक सभासदांचे प्रतिनिधी. (पहिल्या ५० ला १, ५० ते १०० ला २ व १०० पेक्षा अधिकला ३).

१ फेलोज, पेट्रन्स व लाइफ मेंबर्सचा प्रतिनिधी.

१ सरकारनियुक्त.

१ सहकारी खात्याचे रजिस्ट्रार.

३ सबंद राज्य ज्यांचें कार्यक्षेत्र आहे, अशा सोसायटयांचे प्रतिनिधी.

टीपः—मुंबई राज्याची पुनर्घटना होण्यापूर्वींच्या मुंबई राज्यांत ज्या सहकारी संस्था केंद्रीय संस्था म्हणुन कार्य करीत असतील व ज्या सोसायटया सौराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा विभागांत केंद्रीय सोसायटया म्हणून कार्य करीत असतील, अशांचें कार्यक्षेत्र सबंद मुंबई राज्य आहे असें समजलें जाईल.

## सिमेंटसंबंधीं विशेष माहिती

१. भारतांतील विकास कार्यांत महत्त्वाचें बांधकाम साहित्य म्हणून पोलादानंतर केवळ सिमेंटचा क्रम लागतो. देशांतील सिमेंटची मागणी १९४९–५१ या मुदतींत प्रतिवर्षी २६ लक्ष टन होती, ती १९५६–५७ मध्यें वाढून १ कोटी टनापर्यंत गेली.

२. या देशांत १९४७ मध्यें, फाळणीनंतरच्या काळांत १८ सिमेंट कारखाने होते व त्यांची निर्धारित उत्पादनशक्ति २१ लक्ष टन होती. सध्यां २८ कारखाने असून त्यांची निर्धारित उत्पादनशक्ति ४९ लक्ष टन आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत सिमेंटचें उत्पादन १ कोटी २० लक्ष टन झालें पाहिजे असा संकल्प आहे. हा आंकडा सध्यांच्या निर्धारित शक्तीपेक्षा २॥ पटीनें जास्त आहे.

३. भारतांत १९५०–५१ मध्यें सिमेंटचें प्रत्यक्ष उत्पादन २६ लक्ष टन, १९५२–५३ मध्यें ३५ लक्ष टन व १९५५–५६ मध्यें ४६ लक्ष टन झालें.

४. सिमेंट धंद्यांत १९५०–५१ पर्यंत एकूण भांडवल २९ कोटी रु. होतें. एप्रिल, १९५५ पर्यंत नवे कारखाने व चालू कारखान्यांची वाढ यांसाठीं १५ कोटी रुपये गुंतविण्यांत आले. १९५६ पर्यंत या धंद्यांतील संकल्पित वाढीसाठीं ७५ कोटी रुपयांवर भांडवली खर्च येईल.

५. सरकारनें या धंद्यांत आतां प्रवेश केला असला तरी या धंद्यांतील बहुतांश वाढ खासगी क्षेत्रांतच झालेली आहे. सरकारनें उत्तरप्रदेश, मुंबई व म्हैसूर राज्यांत प्रत्येकी एक याप्रमाणें एकूण तीन कारखाने काढले आहेत.

६. या धंद्यांत पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभीं ३३,००० कामगार नोकरींत होते. सध्यां हीच संख्या सुमारें ४०,००० आहे. १९६०–६१ पर्यंत ही संख्या ७५,००० च्या बेतास जाईल असा अंदाज आहे.

---

## बाँबे पोर्ट ट्रस्टची १९५५–५६ मधील कामगिरी

मुंबई बंदरांत १९५५–५६ मध्यें बरीच म्हणजे १,०३,०५,७९९ टन मालाची उलाढाल झाली. यामुळें या बंदराच्या याबाबतच्या इतिहासांत एक नवा उच्चांक गांठला गेला. सदर वर्षांत ६७,०७,००० टन मालाची आयात झाली तर ३५,९९,००० टन माल निर्यात झाला.

गतवर्षींचेच आयातीचे व निर्यातीचे आंकडे अनुक्रमें ५६,३०,००० टन व १९,५४,००० टन असे आहेत. गतवर्षी १,४०,९०० टन लोखंड व पोलादाची आयात झाली होती. सदर वर्षांत त्यांत वाढ होऊन हा आंकडा २,८१,००० टन झाला.

मुंबई बंदरांत १९५५–५६ मध्यें एकूण १३·९४ दशलक्ष टन भाराच्या २,६२१ बोटी आल्या होत्या. या बंदराचा सदर वर्षांत वापर केलेल्या बोटींची संख्या २४,१९१ होती.

या बंदरविभागांत खर्च करून केलेल्या महत्त्वाच्या बांधकामांत समुद्रकांठीं तेल सांठवणीसाठीं बांधलेल्या केंद्राचा (मरीन ऑइल टर्मिनल) समावेश आहे. (१६४·७५ लक्ष रुपये.)

पोर्ट ट्रस्ट बोर्डानें सदर वर्षांतहि उपयुक्त कामगिरी केली असून त्याबद्दल सरकारनें बोर्डाची वाखाणणी केली आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.